# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक २३ मार्च, २०१८ / चैत्र २, १९४० ( शके )**

**(१) वित्त व नियोजन, वने मंत्री**
**(२) ग्रामविकास, महिला व बालविकास मंत्री**
**(३) वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री**
**(४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**
**(५) जलसंधारण, राजशिष्टाचार, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री**
**(६) रोजगार हमी, पर्यटन मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५४**

---

## राज्यात मुलींच्या जन्म प्रमाणात घट होत असल्याबाबत

**(१) * ११६०५१ श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील २१ प्रमुख राज्यांपैकी १७ राज्यांमध्ये मुलींच्या जन्म प्रमाणात घट झाली असून यामध्ये महाराष्ट्राचा पाचवा क्रमांक असल्याची माहिती नीती आयोगाने नुकत्याच जाहीर केलेल्या अहवालानुसार निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्याचे निष्कर्ष काय आहेत,
(३) असल्यास, त्यानुसार राज्यात लिंग निदान करून होणारे गर्भपात रोखण्यासह मुलीच्या जन्माचे महत्व पटवून देण्यासाठी व्यापक जनजागृती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नीती आयोगाच्या अहवालानुसार राज्यात सन २०१२-२०१४ या आधारभूत वर्षात मुलींचे जन्मप्रमाण ८९६ होते व ते सन २०१३-२०१५ या संदर्भ वर्षात ८७८ एवढे झाल्याने त्यात १८ अकांनी घट झाली आहे. नागरी नोंदणी अहवालानुसार सन २०१६ मध्ये मुलींचे जन्म प्रमाण ९०४ झाले आहे.
(३) राज्यात लिंग निदान करून होणारे गर्भपात रोखण्यासाठी व मुलीच्या जन्माचे महत्व पटवून देण्यासाठी टि.व्ही., रेडिओ जिंगल ऑडिओद्वारे जनजागृती करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे लिंग गुणोत्तर प्रमाण हा विषय नियोजन समितीच्या बैठकीत चर्चेसाठी घेण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी यांना आयुक्तांमार्फत पत्र पाठविण्यात आले आहे.

तसेच गर्भपात रोखण्यासाठी शासकीय संकेतस्थळ व हेल्पलाईन सुरु करण्यात आली आहे. अवैध गर्भपात करणाऱ्या केंद्राची माहिती देणाऱ्यास बक्षिस दिले जाते. तसेच समुचित प्राधिकारी, पीसीपीएनडीटी यांचेमार्फत केंद्रांची त्रैमासिक तपासणी केली जाते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ब्रम्हपूरी (जि.चंद्रपूर) तालुक्यातील २४ गावातील शेतीसाठी गोसीखुर्द प्रकल्पाचे पाणी मिळण्याबाबत

**(२) * ११०८४९ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रम्हपूरी (जि.चंद्रपूर) तालुक्यातील मेंडकी, मनिकपूर रिठ, गायडोंगरी रिठ, टेकरी रिठ, भानापूर रिठ, शिवसागर तुकूम, शिवसागर गावगल्ला, परसोडी, आमला रिठ, नवेगाव खुर्द, कोरेगाव रिठ, चिचखेडा, गणेशपूर, एकारा, अजुनी रिठ, किटाळी, चंक किटाळी, पळसगाव मक्ता रिठ, चिटक बोद्रा, शेलदा, बोद्रा, लाहरडोगरी या गावातील शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून असून येथे वारंवार दुष्काळ पडत असल्याने या गावातील शेतकऱ्यांनी गोसीखुर्द प्रकल्पाचे पाणी मिळण्याबाबत मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोसीखुर्द प्रकल्पाचा उजवा कालवा या २४ गावांमधून गेला असतांनाही या गावातील जवळपास ९८१७.९२ हेक्टर धान शेती सिंचनापासून वंचित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार ब्रम्हपूरी तालुक्यातील या २४ गावातील ९८१७.९२ हेक्टर धान शेतीला गोसीखुर्द प्रकल्पाचे पाणी मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) गोसीखुर्द उजवा कालवा सदर गावांतुन गेलेला नाही. सदर कालवा contour canal असल्यामुळे त्याचे लाभक्षेत्र हे संपूर्णत: कालव्याच्या डाव्या बाजूस असल्याने, डाव्या भागातील क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळतो. सदर गांवे उजव्या मुख्य कालव्याच्या उजव्या बाजुस असुन त्यांची जमिन पातळी गोसीखुर्द उजवा कालव्याच्या कालवा तळ तलांकापेक्षा उंचावर असल्यामुळे सदर गांवे लाभक्षेत्रात येत नाहीत. त्यामुळे सदर गावांस प्रवाही पद्धतीने पाणी देणे शक्य नाही.

(३) सदर २४ गांवे व गावातील क्षेत्र प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात अतंर्भूत नसल्यामुळे प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिवारा उर्फ जवळा पांचाळ (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) व परिसरातील गावांत रस्त्यांच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(३) * ११४५०५ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिवारा उर्फ जवळा पांचाळ (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) व परिसरातील गावांत पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून करण्यात आलेल्या रस्त्यांच्या डांबरीकरणाच्या कामात अधिकाऱ्याच्या संगनमताने कंत्राटदाराने लाखो रुपयांचा गैरव्यवहार करुन रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यमान सरपंच यांनी या कामांच्या चौकशीसाठी जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करुन दोषी कंत्राटदारांवर व संबधित अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

विद्यमान सरपंच यांनी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील कामाबाबत तक्रार दाखल केली आहे.

(३) व (४) सदर रस्त्याच्या कामास राज्य गुणवत्ता निरीक्षक आणि वरिष्ठ राज्य गुणवत्ता निरीक्षक यांनी भेट दिली असून त्यांनी काम समाधानकारक असल्याचा शेरा दिला आहे.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील राजेवाडी तलावाच्या उजव्या कालव्याच्या प्रशासकीय मंजुरीबाबत

**(४) * १०९३०८ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील राजेवाडी तलावाच्या उजव्या कालव्यास प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कालव्याच्या कामाकरिता किती निधीची तरतूद करण्यात आली आहे,
(३) असल्यास, उक्त कालव्याचे काम तात्काळ सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) अंदाजपत्रक राज्य तांत्रिक सल्लागार समितीमार्फत शासनास सादर करणेबाबतची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आसनगांव (पूर्व) (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील नागरिकांना नियमित पाणीपुरवठा होत नसल्याबाबत

**(५) * १११३१० श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आसनगांव (पूर्व) (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे मोठ्या प्रमाणात लोकवस्ती वाढली असल्याने या परिसरातील गावांमधील तसेच संघवी पॅराडाईज गृह प्रकल्पासह अन्य गृह प्रकल्पांमध्ये राहणाऱ्या नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची टंचाई असल्यामुळे पावसाळ्यात देखील खासगीरित्या दररोज पिण्याचे पाण्याचे टँकर्स मागवावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामपंचायत क्षेत्रातील नागरिकांना पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा करण्याची संबंधित ग्रामपंचायतीची जबाबदारी असताना आसनगांव ग्रामपंचायत जाणीवपूर्वक गेल्या वर्षभरापासून दुर्लक्ष करीत असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पाणीपुरवठा तातडीने सुरु करण्याच्या दृष्टीने तेथील नागरिकांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शहापूर, मुख्य कार्यकारी अधिकारी,

जिल्हापरिषद ठाणे तसेच प्रधान सचिव ग्रामविकास विभाग यांचेकडे अनेकदा निवेदने सादर करुनही अद्यापपर्यंत कार्यवाही झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार आसनगांव (पूर्व) येथील पाण्याच्या समस्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

आसनगांव पूर्व विभाग व संघवी पॅराडाईज गृह प्रकल्प या ठिकाणी माहे जानेवारी, २०१८ कालावधीत तेथील रहिवाशांकडून टँकरने पाणी पुरवठा करण्याबाबत ग्रामपंचायतीकडे लेखी किंवा तोंडी मागणी केली नाही किंवा टँकरने पाणी पुरवठा केल्याचे बील ग्रामपंचायतीला सादर करण्यात आले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) सदर योजना सुरु करताना असलेल्या लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये झपाटयाने झालेली वाढ तसेच काही भागांचे झालेले शहरीकरण यामुळे सदर योजनेंचे पाणी कमी पडत आहे. यासाठी नवीन नळ पाणी पुरवठा करणे गरजेचे असल्याने मुख्यमंत्री पेयजल कार्यक्रम टप्पा -२ अंतर्गत प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हारे (ता.कर्जत, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीमध्ये रस्त्यालगत अनधिकृत बांधकामे सुरु असल्याबाबत

**(६) * १०५२६७ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरळ जवळील कोल्हारे (ता.कर्जत, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीमध्ये राज्यमार्ग आणि जिल्हा परिषदेच्या रस्त्यालगत मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अनधिकृत बांधकामाची शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार अनधिकृत बांधकामे निष्कासीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) श्री.विजय हजारे, अध्यक्ष, महात्मा गांधी तंटामुक्त गाव समिती, यांनी सदर विषयाबाबत दि.१६.११.२०१७ रोजी तक्रार केली आहे.
(२) होय.
(३) व (४) सदर प्रकरणी उप अभियंता (बांधकाम), उपविभाग कर्जत रायगड जिल्हा परिषद यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन दि.२९.१२.२०१७ च्या पत्रान्वये जिल्हा परिषदेच्या इजिमा क्र. २७ लगतच्या ३४ बांधकामांची यादी सादर केली आहे. त्यामध्ये बहुतांशी दुकानगाळे असल्याचे दिसून आले. तसेच यासंदर्भात जिल्हा स्तरावरून अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद यांचे अध्यक्षतेखाली दि.२१.२.२०१८ व दि.२२.२.२०१८ रोजी दोन दिवसांचे पडताळणी शिबीर आयोजित करून उप अभियंता (बांधकाम), उपविभाग ,कर्जत, रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती, कर्जत कडील कनिष्ठ शाखा अभियंता यांचेमार्फत पुन:श्च मोजमापे घेऊन अहवाल मागविण्यात आला आहे. त्यामध्ये सहाय्यक संचालक, नगर रचना यांनी शिफारशीमध्ये संबंधित रस्त्यापासून निश्चित करून दिलेले अंतर व विकासकांनी प्रत्यक्ष इमारत बांधलेले रस्त्यापासूनचे अंतर यांचा ताळमेळ घेऊन पडताळणी करण्यात येत आहे. सहाय्यक संचालक, नगर रचना, रायगड अलिबाग व उप अभियंता, (बांधकाम), उपविभाग, कर्जत, रायगड जिल्हा परिषद यांचा अहवाल प्राप्त झाल्यावरच बांधकामे अनधिकृत आहे किंवा कसे हे निश्चित करता येईल.

-----------------

## औरंगाबाद जिल्हा सामान्य रुग्णालयातील कालबाह्य झालेल्या औषधांबाबत

**(७) * १११७१२ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हा सामान्य रुग्णालयात ५८ लाख रुपयांची औषधे कालबाह्य झाल्याचा अहवाल शासनाच्या भांडार तपासणी पथकाने आरोग्य उपसंचालकांना दिला असल्याचे दिनांक २१ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रुग्णालयातील कालबाह्य झालेली औषधे भरारी पथकाच्या निदर्शनास न आणता त्याची कागदपत्रेही सादर करण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार जिल्हा सामान्य रुग्णालयात कालबाह्य औषधे ठेवणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

रुपये १२,५९,४०३/- ची औषधे कालबाह्य झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) प्रस्तुत प्रकरणी प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवालातील निष्कर्षानुसार संबंधीतांवर नियमानुसार कारवाई प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील १०० गावांमध्ये जिल्हा परिषद, तहसिलदार आणि ग्रामसेवक यांनी केलेला गैरव्यवहार

**(८) * १०९६१४ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील, १०० गावांमध्ये ५ ते ८ हजारात मिळणारे पथदिवे २० ते २२ हजार रुपयात खरेदी केल्याचे कागदोपत्री दर्शवून जिल्हा परिषद, तहसिलदार व ग्रामसेवक यांच्यासह अधिकारी व कर्मचारी यांनी

संगनमत करुन आर्थिक गैरव्यवहार केल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, त्यानुसार गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) प्रकरणी चौकशी करणेत आली असून, संबंधीत ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी व विस्तार अधिकारी (पंचायत) हे दोषी आढळून आलेले आहेत.

(३) अपहारीत रक्कमेच्या वसूली बरोबरच संबंधित दोषी ग्रामसेवक, ग्राम विकास अधिकारी व विस्तार अधिकारी (पंचायत) यांची महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील नियम २ नुसार एक वेतनवाढ एक वर्षासाठी तात्पुरत्या स्वरूपात पुढील वेतनवाढीवर परिणाम न करणारी थांबविणेची कारवाई करणेत आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लोहारा (ता.राळेगांव, जि.यवतमाळ) येथील पाझर तलावाच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(९) * ११५७३७ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहारा (ता.राळेगांव, जि.यवतमाळ) येथे मागील २ वर्षापासून पाझर तलावाचे काम जिल्हा परिषद सिंचन विभागामार्फत भूसंपादन अभावी प्रलंबित राहिल्याने शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ मिळत नसल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोहारा पाझर तलावाच्या भूसंपादनाकरिता १ कोटी २५ लक्ष निधीची आवश्यकता असतांना सदरहू निधी अद्याप वितरीत करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मंजुर झालेल्या पाझर तलावासाठी निधी उपलब्ध करुन काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) आदिवासी उपयोजनेअंतर्गत जिल्हा परिषद, यवतमाळ यांनी प्रशासकीय मान्यता दिलेल्या प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी आदिवासी विकास विभागाकडुन निधी उपलब्ध होवु शकला नाही. त्यामुळे आता सरळ खरेदीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी,यवतमाळ कार्यालयास सादर करण्यात आला आहे. त्यामधील १०.२६ हेक्टर जमिनीच्या संपादनासाठी रु.१२५.०० लक्ष निधीची आवश्यकता असून निधी उपलब्धतेनुसार प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यात येईल.

-----------------

## पुर्णा पाटबंधारे विभाग,वसमतनगर (जि.हिंगोली) अंतर्गत असलेल्या तीन कॅनॉलवरील पुलांची झालेली दुरवस्था

**(१०) * १११३५१ श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर (जि.हिंगोली) अंतर्गत असलेल्या तीनही कॅनॉलवरील पुलांची दुरवस्था झालेली असल्याने सदर तीनही पुलांची दुरुस्ती करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांना दिनांक ०४ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचे पुल हे गावापलिकडे असल्याने पुलांवरून शेतीकरीता शेतकरी व जनावरे पलिकडे जातांना पुलावरून खाली पडून जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तीनही पुलांची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार सदरहू कॅनॉलवरील पुलांची तात्काळ दुरूस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) या संदर्भात संबंधित ग्रामपंचायतीकडे केलेल्या चौकशीवरून अशा घटना घडल्याचे समजते.

(३) सदर तीनही पुलांची पाहणी अधीक्षक अभियंता नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांनी कार्यकारी अभियंता यांचे समवेत दि. २८-०२-२०१८ रोजी केली आहे. सदरील पुलांच्या विशेष दुरूस्ती कामांची अंदाजपत्रके क्षेत्रिय स्तरावर तयार करण्यात आली असून शासनास सादर करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाशिम जिल्ह्यातील मंजूरी मिळालेल्या प्रकल्पांची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(११) * १११५१८ श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील मंजूरी मिळालेल्या प्रकल्पांची कामे काही कारणामुळे अद्याप पूर्ण करण्यात आलेली नसल्यामुळे ९५ गावातील ९ हजाराहून अधिक शेतकरी सिंचनापासून वंचित राहत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार सदरहू अपूर्ण राहिलेले सिंचन प्रकल्पांचे काम तात्काळ पूर्ण करण्यासह सिंचन प्रकल्पांचे काम पूर्ण करण्यास दिरंगाई करणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) सर्वसाधारणपणे प्रकल्प पूर्ण होण्यास खालील कारणांमुळे विलंब झालेला आहे.

१) प्रकल्पाच्या भूसंपादनास कास्तकारांचा विरोध व नवीन भूसंपादन कायद्यानुसार प्रकल्पाच्या किंमतीत झालेली वाढ

२) वनजमीन वळतीकरणास केंद्र शासनाची मान्यता प्राप्त होण्यास लागणारा कालावधी

३) सु.प्र.मा. मिळण्यास विलंब

४) प्रकल्पाची सविस्तर संकल्पने, तांत्रिक अडचणी, दायित्व मान्यता इत्यादींसाठी लागणारा कालावधी

५) जनहित याचिका क्र. १२४/२०१४ मधील न्यायालयीन प्रकरणामुळे स्थगित करावी लागलेली कामे

(३) अपूर्ण राहीलेले सिंचन प्रकल्प हे “ केंद्रशासन सहाय्यीत बळीराजा जलसंजीवनी योजना “ अंतर्गत समाविष्ट करण्यात आलेले असून सदर प्रकल्प पुढील दोन वर्षाचे कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.अपूर्ण राहिलेले सिंचन प्रकल्प हे प्रशासकीय कारणास्तव अपूर्ण राहीलेले असल्यामुळे याकरीता कोणी अधिकारी / कर्मचारी जबाबदार नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आरजखेडा ते गव्हाण (जि.लातूर) रस्त्यावरील नाल्यावर पूल बांधण्याबाबत

**(१२) * ११४४६८ श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील आरजखेडा ते गव्हाण रस्त्यावरील नाल्यावर पूल नसल्याने सदर रस्ता नाल्यातील पाण्यामुळे सतत बंद राहत असल्याने प्रवाशांची वाहतुकीची कोंडी व गैरसोय होत असल्यामुळे सदर रस्त्यावर पूल बांधण्यात यावा अशी मागणी लातूर ग्रामीण स्थानिक लोकप्रतिनिधींनी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नाल्याची पाहणी शासनाने केली आहे काय व त्यानुसार सदर पूल बांधकामासाठी निधी देण्यासह कामाच्या मंजुरीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर रस्ता ग्रामीण मार्ग क्र. ७९ असून एकूण लांबी ३.०० कि.मी. आहे. सदर नाला कि.मी. ०/८०० या साखळी क्रमांकावर असुन त्याची पाहणी करण्यात आली आहे. सदर नाल्यावर पूल बांधकामासाठी अंदाजे रु. ५०.०० लक्ष खर्च अपेक्षित आहे. सदर पूलाचे काम जिल्हा परिषदे मार्फत जिल्हा वार्षीक योजना सन २०१८-१९ च्या आराखड्यामध्ये समाविष्ठ करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील नवजात अर्भकांच्या विक्रीबाबत

**(१३) * ११४५८९ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील डॉ. अरुण पाटील आणि त्यांच्या पत्नीच्या असलेल्या रुग्णालयात गरोदर अल्पवयीन मुली आणि विधवांना आधार देण्यात येत असल्याचे दर्शवून त्यांची अवैधरित्या प्रसूती करुन नवजात अर्भकांना लाखो रुपयांना विकल्याचे दिनांक ६ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इचलकरंजी येथील एका डॉक्टरने दोन अर्भके मुंबई आणि नवरगाव येथील दोन दाम्पत्यांना विकत दिल्याचे व कोरोची येथील चव्हाण मळ्यातील संतोषीमाता अनाथालयात १४ मुले बेकायदेशीररीत्या ठेवल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, त्यानुसार या प्रकरणातील संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४) बेकायदेशीररित्या प्रसुती करुन अर्भकांची विक्री करणाऱ्या डॉ. अरुण पाटील जनरल सर्जिकल व मॅटर्निटी हॉस्पिटल, इचलकरंजी यांच्यावर शिवाजीनगर पोलीस स्टेशन, इचलकरंजी येथे भा.द.वि. कलम ३७०, १७६ आणि ३४ तसेच बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ मधील कलम ७५, ८० व ८१ नुसार दि. ७/२/२०१८ रोजी गुन्हा क्र. ३०/२०१८ दाखल केलेला आहे. त्यानुसार डॉ. अरुण पाटील यांना अटक करण्यात आलेली असुन ७ दिवसांची न्यायालयीन कोठडी जिल्हा सत्र न्यायालय, कोल्हापूर यांनी दिलेली आहे.

संतोषीमाता अनाथ आश्रम, चव्हाणवाडी, कोरोची या संस्थेचे सौ. अनुसया आणि अशोक सुबराव नडगिरे यांच्या विरुध्द शहापूर, पोलिस स्टेशन, इचलकरंजी या ठिकाणी बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ कलम ३४,३२,४२ नुसार दि. ७/२/२०१८ रोजी गुन्हा दाखल केलेला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खेड (जि.पुणे) तालुक्यातील तीर्थक्षेत्रांच्या निसर्ग पर्यटन विकासाच्या प्रस्तावाबाबत

**(१४) * ११५५९९ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील तीर्थक्षेत्र चक्रेश्वर (वाकी तर्फे वाडा), कुंडेश्वर (पॉईंट) तसेच शिंगेश्वर (आडगाव) ही देवस्थाने असून सह्याद्रीच्या उंच डोंगरांमध्ये असलेली ठिकाणे पर्यटन क्षेत्र म्हणून प्रसिद्ध असून लाखो भाविक या

ठिकाणी भेट देत असल्याने वन पर्यटन अंतर्गत पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १० ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.वने मंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या अनुषंगाने दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास वनपरिक्षेत्र खेड व चाकण यांनी प्रस्ताव तयार करून शासनास सादर करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वन पर्यटन स्थळ विकसित करण्यासंदर्भाच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.
(२) व (३) निसर्ग पर्यटना अंतर्गत करावयाच्या कामांचे प्रस्ताव व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळ, नागपूर यांच्याकडून शासनास मान्यतेसाठी सादर केले जातात. प्रश्नात उपस्थित केलेल्या तिनही तिर्थक्षेत्राच्या निसर्ग पर्यटन विकासाचे प्रस्ताव अद्याप पर्यंत मंडळाकडून शासनास प्राप्त झालेले नाहीत.

तथापि, कुंडेश्वर (पाईंट) देवस्थानाच्या प्रस्तावास मंडळाच्या कार्यकारी समितीने दिनांक २६.०२.२०१८ च्या बैठकीत मान्यता दिली असून याकरिता आवश्यक असलेल्या निधीची मागणी जिल्हा नियोजन समिती, पुणे यांचेकडे करण्याबाबत निर्देश दिले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोडोली (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील उपजिल्हा रुग्णालयातील क्ष-किरण यंत्र बंद असल्याबाबत

**(१५) * ११२२७९ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोडोली (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील उपजिल्हा रुग्णालयातील क्ष-किरण यंत्र एक वर्षापासून बंद असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे क्ष-किरण यंत्र बंद असल्यामुळे कोडोली गावासह ५१ गावांना वैद्यकीय सुविधेसाठी तीस ते पन्नास कि.मी. दूर जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशीकरुन या रुग्णालयातील क्ष-किरण यंत्र कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

उपजिल्हा रुग्णालय, कोडोली येथील क्ष-किरण यंत्र सुरु असून, जानेवारी २०१८ मध्ये १७४ व फेब्रुवारी, २०१८ मध्ये १२६, क्ष-किरण चाचण्या करण्यात आलेल्या आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वन जमिनीतून भुयारी मार्गाने 'बोरीवली-ठाणे' या शहरांना जोडणाऱ्या प्रस्तावाबाबत

**(१६) * १०५३२१ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरीवली ते ठाणे या रस्त्याने दीड तासांपेक्षा जास्त असलेले अंतर दहा मिनिटांवर आणण्यासाठी दोन्ही शहरे संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून भुयारी मार्गाने जोडण्याबाबत एमएसआरडीसीने माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये तयार केलेल्या प्रस्तावास केंद्र सरकारने मान्यता दिलेली असून सदर प्रस्ताव सद्यःस्थितीत राज्य शासनाच्या वन विभागाकडे मान्यतेसाठी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहतुकीच्यादृष्टीने अत्यंत महत्वाचा असलेला सदर भुयारी मार्ग प्रकल्प विनाविलंब तातडीने पूर्ण होण्याचे दृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभागाने वन विभागाची परवानगी मिळण्याकरिता आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) दिनांक ३१.१.२०१८ रोजी आयोजित महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाच्या १३ व्या बैठकीत पश्चिम द्रुतगती महामार्ग ठाणे-घोडबंदर रस्त्यास जोडण्यासाठी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वनजमिनीतून भुयारी मार्गाच्या सर्वेक्षण व अन्वेषण करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली असून त्याअनुषंगाने पुढील आवशक ती कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महागांव (जि.यवतमाळ) तालुक्यात सिंचन विभागांतर्गत निकृष्ट दर्जाचे बांधण्यात आलेल्या सिमेंट बंधाऱ्याबाबत

**(१७) * ११०५५२ श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागांव (जि.यवतमाळ) तालुक्यात सिंचन विभागांतर्गत कोट्यवधी रुपये खर्च करुन बांधण्यात आलेल्या निकृष्ट दर्जाच्या सिमेंट बंधाऱ्यांची पाहणी प्राप्त झालेल्या तक्रारीवरुन सिंचन विभागाचे कार्यकारी अधिकारी यांनी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निकृष्ट दर्जाच्या बांधण्यात आलेल्या सिमेंट बंधाऱ्यांची तक्रार करणाऱ्यांशी सिंचन विभागाचे कार्यकारी अधिकारी यांनी गैरवर्तन केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह निकृष्ट कामे शासनाच्या गुणवत्ता दर्शक तत्त्वानुसार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, पुसद यांचेमार्फत महागांव तालुक्यातील सर्व कामांची चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवालानुसार सदर कामे समाधानकारक झाली असल्याचे आढळून आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उमरेड व भिवापूर (जि.नागपूर) तालुक्यातील ग्रामपंचायतीमधील जलयुक्त शिवार योजनेतील बंधाऱ्यांच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(१८) * १०८१९० श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील उमरेड व भिवापूर तालुक्यामधील सेय, वेणी, खैरी नागोबा, नक्षी व कारगाव ग्रामपंचायतीमधील जलयुक्त शिवार योजनेतील १ कोटी ५४ लाख ३४ हजार रूपयांच्या बंधाऱ्यांची कामे निविदा न काढता करण्यात आल्याबाबतची बाब माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेमधील बंधाऱ्यांची कामे करतांना लघुसिंचन विभागाच्या अधिकाऱ्यांनी कामाचे अर्ज व त्यांच्याशी संबंधीत कागदपत्रे अथवा निविदा न काढता तातडीने केल्यामुळे बंधाऱ्याची कामे निकृष्ट दर्जाची झाली असून बंधाऱ्यांना तडे गेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार बंधाऱ्याच्या कामाच्या कंत्राटांची निविदा न काढता कंत्राट देणाऱ्या लघुसिंचन विभागाचे अधिकारी व संबंधीत ग्रामपंचायत सरपंच, सदस्य व ग्रामसेवक यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही. तथापि, यासंदर्भात दै.लोकमत या वृत्तपत्रात बातमी प्रसिद्ध झाली होती.
(२) हे खरे नाही.
(३) दै.लोकमत वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातमीच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांनी मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमून चौकशी केली आहे. चौकशी अहवालनुसार प्रस्तुत प्रकरणी कोणताही गैरव्यवहार झाल्याचे आढळून आलेले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कडा (ता.आष्टी, जि.बीड) येथील संत मदन महाराज देवस्थानातील विविध विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(१९) * १०८५२८ ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कडा (ता.आष्टी, जि.बीड) येथील संत मदन महाराज हे एक मोठे देवस्थान असून या ठिकाणी प्रतिवर्षी अडीच ते तीन लाख भाविक आणि देशी - विदेशी पर्यटक भेट देत असल्याने पर्यटन विकास कार्यक्रमांतर्गत सदरहू देवस्थानातील विविध विकासकामांना आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. पर्यटन राज्यमंत्री यांच्याकडे दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजी व तत्पूर्वीही अनेक वेळा लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार कडा येथील श्री संत मदन महाराज देवस्थानातील विविध विकासकामांसाठी पर्यटन विकास कार्यक्रमांतर्गत आवश्यक निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय. मा. मंत्री (पर्यटन) यांना निवेदन देण्यात आले आहे.

(२) मा. लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री (पर्यटन) यांच्याकडे दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्याकडून विकास कामांबाबतचा वस्तुस्थिती अहवाल मागविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई (पूर्व) (जि.पालघर) येथील ग्रामीण भागात वनपरिक्षेत्र वनअधिकारी भूमाफियांच्या संगनमताने अनधिकृत बांधकामे करीत असल्याबाबत

**(२०) * ११०२०६ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (पूर्व) (जि.पालघर) येथील जंगल संपदेच्या संरक्षणाची जबाबदारी असलेल्या गोखिवरे वनपरिक्षेत्र वनअधिकारी यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर करुन ग्रामीण भागात अनधिकृत बांधकामे करण्यासाठी भूमाफियांना मदत करत असल्याबाबतच्या तक्रारी येथील लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास तसेच वारंवार मा.ग्रामविकास मंत्री यांचेकडे केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार अनधिकृत बांधकामे निष्कासीत करण्यासह भूमाफियांना उक्त ग्रामीण भागात अनधिकृत बांधकामे करण्यास मदत करणाऱ्या अधिकारी व भूमाफियांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) वसई (पूर्व) (जि.पालघर) येथील जंगल संपदेच्या संरक्षणाची जबाबदारी असलेल्या गोखिवरे वनपरिक्षेत्र वनअधिकारी यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर करुन ग्रामीण भागात अनधिकृत बांधकामे करण्यासाठी भूमाफियांना मदत करत असल्याबाबतच्या तक्रारी लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी मा. ग्रामविकास मंत्री यांचेकडे केल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(२) व (३) वसई (जि. पालघर) येथील मौजे बापाणे संरक्षित वन सर्वे क्रमांक ११४ येथे सन २०१६ मध्ये अतिक्रमण करुन चाळींचे बांधकाम झाल्याचे निदर्शनास आले होते.

सदर अतिक्रमण निष्कासिन करण्यात आले असून सदर अतिक्रमणास जबाबदार असणाऱ्या ३ व्यक्तीपैकी तत्कालीन वनक्षेत्रपाल, तुंगारेश्वर अभयारण्य, गोखिवरी श्री. एम. टी. अहिरे यांना निलंबित करण्यात आले होते. त्यांचे विरुध्दातील विभागीय चौकशीतील सर्व साक्षीदारांची सुनावणी पुर्ण झाली असून सद्यस्थितीत सदर वनक्षेत्रपाल निलंबीत आहेत.

श्री. महादेव दयानंद गावंड, तत्कालीन वनपाल कामण यांना निलंबीत करण्यात आले आहे. त्यांचे विरुध्दातील विभागीय चौकशीत ते दोषी आढळून आले आहेत. श्री. महादेव दयानंद गावंड यांचा निलंबन कालावधी हा सर्वप्रयोजनार्थ निलंबित कालावधी गणण्यात आला असून एक वर्षाकरिता वेतनवाढ रोखण्याची शिक्षा बजावण्यात आली आहे.

श्री. प्रशांत शालग्राम जाधव, तत्कालीन वनरक्षक सारजामोरी यांचे विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील १९७९ अंतर्गत नियम ८ खाली दोषारोपत्र बजावण्यात आले आहे. तसेच त्यांचे विरुध्दातील विभागीय चौकशीची कार्यवाही पुर्ण झाली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## श्रीक्षेत्र जरंडेश्वर (ता.कोरेगाव, जि.सातारा) येथील बोरखळ ते जरंडेश्वर या रस्त्याच्या कामाबाबत

**(२१) * १०७०५१ श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीक्षेत्र जरंडेश्वर (ता.कोरेगाव, जि.सातारा) येथील बोरखळ ते जरंडेश्वर या मार्गावरील रस्त्याच्या कामाला प्रशासकीय मंजूरी एक वर्षापूर्वी मिळालेली असताना सदर कामासाठी अद्याप निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रीक्षेत्र जरंडेश्वर ते बोरखळ या रस्त्याला निधी मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीनुसार सदर रस्त्याच्या कामास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) सदर कामास प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली नाही. तथापि, दि.१४.१२.२०१७ च्या निवेदनाद्वारे मा.लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे. तसेच प्रश्नांकित तीर्थक्षेत्रांस दि.१६.११.२०१२ पुर्वी ब वर्ग दर्जा देण्यात आला असून (रू.१.०० कोटी मर्यादा) पायथा ग्रामीण मार्ग ६० या रस्त्याच्या सुधारणेसह विकास कामांना रू.९५ लक्ष निधी दिलेला आहे. तसेच शासन निर्णयातील नियमानुसार तीर्थक्षेत्र विकास योजनेंतर्गत १०००.०० मीटर अंतरापर्यंत रस्त्याची कामे अनुज्ञेय आहेत. सबब, अशा तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी (रू.१.०० कोटी मर्यादा असलेले) रस्त्यासह इतर विकास कामे करता यावीत म्हणून रू.२.०० कोटी मर्यादा करण्याबाबत नियोजन विभाग व वित्त विभागाच्या अभिप्रायांसह मा.मंत्रीमंडळास प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे.

तसेच प्रश्नाधीन रस्त्याची मागणी २.५० कि.मी. असल्याने अन्य योजनेतुन सदर काम करता येईल का याबाबत प्रस्तावित करण्याचे निर्देश जिल्हा परिषद, सातारा यांना देण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात एक लाखापेक्षा अधिक कॅन्सरग्रस्त रुग्ण मौखिक आरोग्य तपासणीत आढळून आल्याबाबत

**(२२) * १०५९६५ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे दिनांक १ ते ३१ डिसेंबर, २०१७ या कालावधीत राज्यातील ग्रामीण आणि शहरी भागातील ३० वर्षे व त्यापुढील वयोगटातील महिला व पुरुषांच्या मौखिक आरोग्याची तपासणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तपासणीत सुमारे ९ लाखाच्या आसपास नागरिकांमध्ये तोंडाच्या कर्करोगाची तीव्र लक्षणे आढळून आली असून या रुग्णांमध्ये मद्य, तंबाखू-सुपारी व गुटख्याचे व्यसन असणाऱ्या व्यक्तींचा समावेश असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रुग्णांवर उपचारासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे तसेच तंबाखू-सुपारी-गुटख्याचे पदार्थाच्या सेवनापासून लोकांना परावृत्त करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) दिनांक १ ते ३१ डिसेंबर, २०१७ या कालावधीत २.१४ कोटी लोकांची मौखिक आरोग्याची चाचणी (स्क्रिनींग) करण्यात आली व त्यामध्ये २,६२,४३१ जणांना मौखिक आरोग्याची लक्षण आढळून आली व कर्करोगाची लक्षणे असलेली संख्या जवळपास १% निघाली ती जागतिक आरोग्य संस्थेच्या (WHO) अभ्यास निष्कर्षास मिळती जुळती आहे. यात तंबाखु-सुपारी व गुटख्याचे व्यसन असणा-या व्यक्तींचा समावेश असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) तज्ञांच्या तपासणीनुसार बायोप्सी घेऊन त्यानंतर आवश्यक असल्यास स्पेशालिटी रुग्णालय / जिल्हा रुग्णालय / शासकीय वैद्यकीय महाविद्यालय / महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी आरोग्य योजनेशी संलग्नीत रुग्णालयात पुढील औषधोपचार करण्यात येत आहेत.

तंबाखु-सुपारी-गुटखा या पदार्थापासून परावृत्त करण्यासाठी राज्यात तंबाखु नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाव्दारे तंबाखुच्या दुष्परिणामाबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हदगाव व उमरखेड (जि.नांदेड) तालुक्यातील उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाच्या कालव्यांसाठी संपादीत केलेल्या जमिनींचा मोबदला देण्याबाबत

**(२३) * १०९१४६ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हदगाव व उमरखेड (जि.नांदेड) तालुक्यातील उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाच्या कालव्यांसाठी शेकडो हेक्टर शेत जमिनी संपादीत करण्यात आल्या असतानाही अद्यापी संबधित शेतकऱ्यांना त्याचा संपूर्ण मोबदला व भूभाडे मिळाले नसल्याचे दिनांक ८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमरास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार निधीची तरतूद करुन प्रकल्पग्रस्तांना जमिनीचा मोबदला व भूभाडे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) संपादित जमीनीचा संपूर्ण मोबदला अदा करण्यात आला आहे.

भू-भाडे प्रस्तावावर उर्ध्व पैनगंगा प्रकल्प मंडळ, नांदेड यांचे कडून कार्यवाही प्रगती पथावर आहे.

(३) भू-भाडे प्रस्तावावर संबंधीत क्षेत्रीय कार्यालयाकडून कार्यवाही प्रगतीपथावर असून निधी उपलब्धते नुसार भू-भाडे अदा करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुर्डी ते आंजर्ले, चिंचाळी-सातेरा-जामगे व मुगीज-टांगर-आवाशी (ता.दापोली, जि.रत्नागिरी) रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(२४) * ११५४०० श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील मुर्डी ते आंजर्ले, चिंचाळी-सातेरा-जामगे व मुगीज-टांगर-आवाशी या ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरवस्था झाली असून या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम निधी अभावी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्यांवर वारंवार अपघात होत असून ग्रामस्थ, विद्यार्थी तसेच कोकणात पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांची गैरसोय होत असल्याने उक्त रस्त्यांचे कामासाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देवून उक्त रस्त्यांचे डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने शासनाने उक्त रस्त्यांची पाहणी केली आहे काय व त्यानुसार रस्त्यांचे डांबरीकरण करण्यासाठी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रश्नांकित रस्त्यांच्या कामासाठी तातडीने निधी देवून रस्त्यांचे डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे. तथापि, सदर रस्त्यांवर अपघात झाल्याचे आढळून आले नाही.

(३) प्रश्नांकित रस्त्यांची जिल्हा परिषदेमार्फत पाहणी करण्यात आली आहे.

मुर्डी ते आंजर्ला - हा रस्ता ग्रामीण मार्ग १७६ दर्जाचा असून त्याची लांबी १.०० कि.मी.आहे. संपूर्ण लांबी डांबरी पृष्ठभागाची असून सदर रस्त्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

चिंचाळी-सातेरे-जामगे - हा रस्ता इतर जिल्हा मार्ग ११ दर्जाचा आहे. या रस्त्याची एकूण लांबी ५.०० कि.मी.असून डांबरी पृष्ठभागाची आहे. सदर रस्त्याचा ३.०० कि.मी. चा पृष्ठभाग सुस्थितीत असून उर्वरित भागाची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

मुगीज-टांगर-आवाशी - हा रस्ता इतर जिल्हा मार्ग १३ दर्जाचा असून एकूण लांबी १०.०० कि.मी.आहे. रस्त्याचा संपूर्ण पृष्ठभाग डांबरी आहे.

सदर रस्त्यावर सन २०१४-१५ मध्ये गट ब अंतर्गत कि.मी. ६/३०० ते ७/३०० मध्ये डांबरी नूतनीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. सन २०१५-१६ मध्ये खनिकर्म योजनेतून कि.मी. १/२०० ते १/८०० व २/८०० ते ४/७०० मध्ये डांबरी नूतनीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

सदर रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम विविध योजनांतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीनुसार टप्प्या टप्प्याने करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## देऊळगाव कुंडपाळ (ता.लोणार, जि.बुलढाणा) या गावाच्या विकासासाठी मंजूर झालेला निधी नियमबाहयरित्या खर्च करुन निकृष्ट दर्जाचे काम केल्याबाबत

**(२५) * १०९५०१ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगाव कुंडपाळ (ता.लोणार, जि.बुलढाणा) या गावाच्या विकासासाठी दलित वस्ती तसेच नागरी सुविधा अंतर्गत मंजूर झालेल्या लाखो रुपयांचा निधी नियमबाहयरित्या खर्च करुन निकृष्ट दर्जाचे काम करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार सदर निधी नियमबाहयरित्या खर्च करुन निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबतची तक्रार प्राप्त झाल्यानुसार उपविभागीय अधिकारी, जिल्हा परिषद बांधकाम, उपविभाग खामगांव जि.बुलढाणा यांना सदर प्रकरण चौकशी करता देण्यात आले त्यानुसार उपविभागीय अधिकारी, जिल्हा परिषद बांधकाम, उपविभाग खामगांव जि.बुलढाणा यांनी दि.२४.०६.२०१७ रोजी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी भेट देवुन चौकशी केली त्यामध्ये सदर रस्त्याचा पृष्ठभाग व्यवस्थित झाला नसून काही भागात रस्त्यावरील रेती निघत असल्याचे तसेच रस्त्यामधे expansion joints टाकले नसल्याचे निदर्शनास आले त्यानुषगांने निदर्शनास आलेल्या त्रुटींची पुर्तता करण्यात येवून तसेच कामामध्ये किरकोळ दुरुस्त्या करण्याबाबत सूचित करण्यात आल्यानुसार काम पुर्ण करण्यात आले असून सदर कामाचे पुर्णत्वाचे प्रमाणपत्र व गुणवता चाचणी अहवाल प्राप्त करून घेण्यात आले आहे. तसेच सदर कामाच्या अनुषंगाने संबंधितांवर कारवाई प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील ग्रामपंचायतींनी ग्राम निधीचा केलेला अपहार

**(२६) * ११५२८४ श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात स्थानिक लेखा निधी शाखेने वेळोवेळी लेखा परीक्षण करुन आक्षेप नोंदविलेले असतांना त्याकडे दुर्लक्ष करुन ग्राम निधीचा ८ कोटी ७३ लाख रुपयांचा अपहार जिल्ह्यातील ग्रामपंचायतींनी केल्याचे जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त विभाग आणि विभागीय महसूल आयुक्त कार्यालयाकडून दरवर्षी नियमितपणे होणाऱ्या तपासणीत निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार अपहार करणाऱ्या या ग्रामसेवकांवर कारवाई करण्यासह त्यांच्याकडून अपहार केल्याची रक्कम वसूली करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: हे खरे आहे.

स्थानिक लेखा विभागाकडून वेळोवेळी करण्यात येणाऱ्या ग्रामपंचायतीच्या ग्रामनिधीच्या नियमित लेखापरिक्षणाच्या तपासणीत माहे जानेवारी, २०१८ अखेर नाशिक जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या रु. ११,३२,७०,१९६/- एवढया रकमेच्या ग्रामनिधीच्या अपहाराची एकूण ४४६ प्रकरणे आढळून आली आहेत. सदरची प्रकरणे ही १९६२ पासूनची आहेत.

(२) नाशिक जिल्ह्यातील ग्रामनिधीच्या अपहाराच्या प्रकरणात ६८० इतके ग्रामसेवक व १२९ सरपंच दोषी आढळून आले आहेत. त्यांच्याविरुध्द शासकीय नियमानुसार कारवाई केली आहे.

(३) माहे जानेवारी, २०१८ अखेर ग्रामनिधीच्या एकूण ४४६ प्रकरणापैकी २०० प्रकरणातीत रक्कम रु. १,४७,५०,०७८/- संबंधितांकडून वसूल करण्यात आली आहे. ३५ प्रकरणात रुपये ७५,०३,३६२/- इतक्या रकमेचे संबंधितांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहे. २० प्रकरणात रक्कम

रु. ३६,६२,९२५/- इतक्या रकमेचा बोजा संबंधितांचे मिळकतीवर दाखल करण्यात आला आहे. उर्वरित १९१ प्रकरणातील रक्कम रु. ८,७३,५३,८३१/- इतक्या अपहारित रकमेच्या वसुलीची कारवाई सुरु आहे. याबाबत तालुका स्तरावर विशेष वसुली कॅम्प आयोजन, फौजदारी गुन्हे दाखल करणे, मिळकतीवर बोजा दाखल करणे, खाते चौकशी प्रस्तावित करणे इ. कारवाई सुरु आहे.

(४) सदरची अपहाराची प्रकरणे सन १९६२ पासूनची असल्याने या प्रकरणातील ४६ ग्रामसेवक हे मयत झाले आहेत व ३५ प्रकरणे न्यायप्रविष्ठ असल्याने १००% वसुली अद्‌याप झालेली नाही.

-----------------

## मौजे ताम्रपर्णी नदीवरील दुडगे बंधारा, घटप्रभा नदीवरील पिळणी व भोगोली (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे पिलर नादुरुस्त असल्याबाबत

**(२७) * १०७२३१ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे ताम्रपर्णी नदीवरील दुडगे बंधारा, घटप्रभा नदीवरील पिळणी व भोगोली (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे पिलर नादुरुस्त झाल्याने हा बंधारा वाहतूकीस अतिशय धोकादायक बनला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री यांना दिनांक २६ जुलै, २०१६ व २८ डिसेंबर, २०१७ रोजी लेखी निवेदनाद्‌वारे सदर बंधारा दुरुस्ती करण्याबाबतची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बंधाऱ्यांची शासनाने पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सदर बंधाऱ्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) दुंडगे बंधाऱ्याचे २ पिलर अंशत: व एक पिलर बऱ्याच अंशी क्षतिग्रस्त आहे.

पिळणी व भोगोली या बंधाऱ्याचे पिलर सुस्थितीत आहेत. सदर बंधाऱ्यांवरुन सार्वजनिक वाहतूक करणे अभिप्रेत नाही.

(२) होय.

दि.०२.०५.२०१७ व दि.२८.१२.२०१७ रोजीच्या निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

(३) होय.

(४) ताम्रपर्णी नदीवरील दुंडगे येथील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे क्षतीग्रस्त पिलरच्या विशेष दुरुस्ती कामाचे अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

निधी उपलब्धतेनुसार दुरुस्ती करण्याचे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अहमदनगर जिल्हा परिषदेच्या विशेष घटक योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(२८) * १०७८९३ श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हा परिषदेच्या कृषि विभागामार्फत अनुसूचित जाती, नवबौध्द शेतकऱ्यांच्या सबलीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या विशेष घटक योजनेत गैरव्यवहार करणाऱ्या लाभार्थ्यांसह संबधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार सदर योजनेत गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) व (३) प्रश्नाच्या निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असता नेवासा पंचायत समिती अंतर्गत सन २०१४-१५ व २०१५-१६ मध्ये लाभार्थ्यांसह बैलजोडी व बैलगाडी देण्याच्या कार्यपध्दतीत अनियमिता आढळून आल्याने संबंधित कृषि अधिकारी यांना निलंबीत करण्यात आले असून त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी करुन त्यांना शिक्षा प्रस्तावित करण्यात येत आहे.

या निवेदना मुळे जिल्ह्यातील उर्वरित तालुक्यामध्ये या योजनेंतर्गत दिलेल्या बैलगाडी व बैलजोडीचा विनियोग न करणाऱ्या विरुध्द कारवाई करण्याचे आदेश संबंधित गट विकास अधिकारी यांना दिले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मेघरे (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) गावात जवाहर रोजगार हमी योजनेंतर्गत झालेला गैरव्यवहार

**(२९) * ११४४१४ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेघरे (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) गावातील लाभार्थींना जवाहर रोजगार हमी योजनेंतर्गत विहीर मंजूर झाली असतानाही विहीर न बांधता माजी सरपंच व अधिकारी यांनी संगनमताने सदर योजनेचे पैसे घेवून गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच तत्कालीन पाणी पुरवठा अभियंता आणि अधिकारी यांनी संगनमताने पदाचा गैरवापर करून लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याची तक्रार मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) सदर मेघरे गावी जवाहर विहीर योजने अंतर्गत मान्यता देण्यात आलेली सिंचन विहीर लाभार्थीने अनुज्ञेय ठिकाणी बांधली नसल्याचे सकृतदर्शनी दिसून आले. तत्कालीन शाखा अभियंता/ उप अभियंता, म्हसळा यांनी लाभार्थीस विहीरीच्या बांधकामाचा आराखडा करुन दिला त्या झालेल्या कामाच्या देयकाला पंचायत समिती, श्रीवर्धन यांच्याकडून मान्यता देण्यात आली आहे. सदर विहीर संबंधित लाभार्थीने परस्पर अन्य ठिकाणी बांधली आहे. त्यानुसार चौकशीची कार्यवाही सुरु आहे. यासंदर्भात प्रत्यक्ष विहीर कोणत्या गट क्र. मध्ये बांधलेली आहे यासंबंधी चौकशी करण्याकरिता उप अभियंता, म्हसळा यांनी तहसीलदार, श्रीवर्धन यांना लेखी कळविले आहे. या प्रकरणातील चौकशीच्या संदर्भात सकृतदर्शनी जबाबदारांना नोटीस देऊन खुलासा मागविणेत आला आहे. प्राप्त खुलाशाच्या अनुषंगाने पुढील उचित कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्हा परिषदेंतर्गत ग्रामपंचायतींमध्ये झालेली अनियमितता

**(३०) * १०७६११ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हा परिषदेंतर्गत ग्रामपंचायतींमध्ये सामान्य निधी, जवाहर रोजगार योजना, जवाहर ग्राम समृध्दी योजना व संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना आदी योजनेसह इतर योजनांच्या निधीमध्ये अनियमितता झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन १९६२ पासून बुलढाणा जिल्हा परिषदेंतर्गत किती ग्रामपंचायतींमध्ये व किती प्रकरणात अनियमितता निदर्शनास आली व एकूण गैरव्यवहाराची रक्कम काय आहे,
(३) असल्यास, याबाबतची चौकशी करुन गैरव्यवहाराची रक्कम वसूलीसह संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) पंचायत समिती अंतर्गत सन १९६२ ते २०१७-२०१८ पर्यंत ग्रामपंचायतीतील ग्रामनिधीमध्ये १२३३ प्रकरणे आणि सन १९९३ ते २०१७-१८ जरोयो/जग्रासयो/ सग्रारोहयो निधीमध्ये ३७२ अशी एकूण १६०५ प्रकरणे खास लेखा अहवालावरुन निदर्शनास आली आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणांमध्ये सामान्य निधीतील एकूण ८,५४,५४,६१६/- आणि जरोयो/जग्रासयो/संग्रारोहयो निधीतील एकूण १,६३,२०,२९५/- एवढी रक्कम गुंतलेली आहे.

(३) सामान्य निधीच्या संशयित अफरातफरीच्या एकूण रु.८,५४,५४,६१६/- इतक्या रक्कमेपैकी एकूण ८७३ प्रकरणांमध्ये रु.४,७६,७०,६८४/- रुपयांची वसुली व्याजासह करण्यात आलेली आहे. उर्वरित एकूण ३६० प्रकरणांपैकी २३७ प्रकरणात वसुलीची कार्यवाही सुरु आहे. १२३ प्रकरणे ही सन २०१६-२०१७ मध्ये प्राप्त झाली असून याबाबत चौकशी करुन जबाबदारी निश्चित करण्यात येत आहे. अशाप्रकारे ३६० प्रकरणांमध्ये रु. ३,७७,८३,९३२/- एवढया रक्कमेच्या वसुलीची कार्यवाही करण्यात येत आहे.

जरोयो/जग्रासयो/सग्रारोयो निधीच्या अफरातफरीच्या ३७२ प्रकरणांपैकी २८३ प्रकरणांत संशयित अफरातफरीच्या एकूण रु.१,६३,२०,२९५/- इतक्या रक्कमेपैकी एकूण रुपये १,२९,४८,८३०/- रुपयांची वसुली व्याजासह करण्यात आलेली आहे. उर्वरित ८९ प्रकरणांपैकी ५२ प्रकरणात वसुलीची कार्यवाही सुरु असून ३७ प्रकरणांमध्ये जबाबदारी निश्चित करुन प्रलंबित रु.३३,७१,४६५/- एवढया रक्कमेच्या वसुलीची कार्यवाही करण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी संबंधित दोषी असलेले ५२ ग्रामसेवक यांची एक वार्षिक वेतनवाढ, ७ ग्रामसेवक यांची दोन वार्षिक वेतनवाढ थोपविण्यात आली आहे. ४ दोषी ग्रामसेवक बडतर्फ असून, १ पोलीस केस आहे आणि १ खातेचौकशी आहे. ८० ग्रामसेवकांना ताकीद देण्यात आली आहे.

प्रलंबित रकमेचे वसुलीसाठी पंचायत समिती स्तरावर वेळोवेळी त्यावर आयोजित करण्यात येत आहे. तसेच दरमहा होणाऱ्या सभेमध्ये आढावा घेऊन वसुली संदर्भात सातत्याने प्रकरणाचा पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बारामती (जि.पुणे) तालुक्यात बनावट नावाने ग्रामपंचायत कार्यरत करुन केलेला गैरव्यवहार

**(३१) * १०५४९४ श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यात १९८५ ते २०१२ सालापर्यंत तब्बल २८ वर्षांपासून ‘ग्रामपंचायत बारामती ग्रामीण’ या नावाने बनावट लेटर हेड आणि स्टँप तयार करुन ग्रामपंचायत कार्यरत असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या २८ वर्षांमध्ये ग्रामपंचायतीची निवडणूक झालेली नसताना संबंधित तहसीलदारांची निधी वाटप केल्याबाबत महसूल आणि ग्रामविकास विभागाने चौकशी केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बनावट ग्रामपंचायतीमध्ये २८ वर्षांच्या कालावधीत ग्रामसेवक विस्तार अधिकारी आणि गटविकास अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले तसेच या ग्रामपंचायतीच्या बनावट खात्यांवर निधी जमा होत असताना सदर ग्रामपंचायतीच्या व्यवहाराचे आर्थिक ऑडीट जाणीवपूर्वक दुर्लक्षित केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार बनावट नावाने ग्रामपंचायत कार्यरत करुन ग्रामपंचायतीचा निधी बनावट खात्यांवर जमा करणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२), (३), व (४) हे खरे नाही.

तथापि, बारामती ग्रामीण हा त्रिशंकू भाग बारामती नगर परिषदेमध्ये नगर विकास विभागाच्या शासन अधिसूचना दिनांक २१ नोव्हेंबर, २०१२ अन्वये समाविष्ट करण्यात आला आहे. तत्पूर्वी सदरील भाग हा बारामती ग्रामीण या नावाने पंचायत समिती मळद गणात समाविष्ट होता.

याप्रकरणी मा. समिती प्रमुख, पंचायती राज समिती यांचेकडे दिनांक २३ नोव्हेंबर २०१५ रोजी प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने मा. समिती प्रमुखांनी सखोल चौकशी करण्याबाबत दिलेल्या निर्देशास अनुसरून शासन स्तरावरून दिनांक ०२ डिसेंबर, २०१५ रोजीच्या शासन पत्रान्वये सदस्यीय चौकशी समिती नियुक्त करण्यात आली. सदर समितीने दिनांक ०७ एप्रिल, २०१६ रोजी सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने शासनस्तरावरून बारामती ग्रामीण या त्रिशंकू भागाकरीता नजिकच्या ग्रामपंचायत अथवा नगरपरिषदेमध्ये समाविष्ट करण्याची अथवा स्वतंत्र ग्रामपंचायत म्हणून घोषित करण्याची कार्यवाही वेळीच का करण्यात आली नाही, त्याकरीता जबाबदार असणाऱ्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांचेवर तसेच सदर भागास ग्रामपंचायत बारामती ग्रामीण असे नाव देण्यास जबाबदार असलेल्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांचेवर दोषारोपपत्र बजावण्यात येऊन त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेऊन किंवा सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेसाठी तात्काळ प्रस्ताव सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त, पुणे यांना शासन पत्र दिनांक २६ ऑक्टोबर, २०१६ अन्वये कळविले होते. त्याअनुषंगाने विभागीय आयुक्त, पुणे यांचेकडून दिनांक १० सप्टेंबर, २०१७ रोजीच्या पत्रान्वये तत्कालीन ४ अधिकाऱ्यांविरूद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अन्वये शिस्तभंग विषयक कारवाईचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावावर कार्यवाही सुरू आहे.

त्याचप्रमाणे जिल्हा परिषद, पुणे कडून जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील तत्कालीन ०३ ग्रामसेवक, ०१ ग्राम विकास अधिकारी व ०२ विस्तार अधिकारी असे एकूण ६ कर्मचाऱ्यांविरूद्ध विभागीय चौकशीची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यातील बंधाऱ्यांची कामे निकृष्ट दर्जाची केल्याबाबत

**(३२) * १०८२५८ श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यात जिल्हा परिषद, औरंगाबाद सिंचन विभागातर्फे अनेक सिमेंट बंधारे सन २०१५-२०१६ या कालावधीत बांधण्यात आले असून या सर्व बंधाऱ्यांबाबत अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक जिल्हा परिषद पदाधिकारी यांनी केलेल्या तक्रारी वरून धनगाव येथील बंधाऱ्याची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी पाहणी केली असता वाळू ऐवजी कच खडी वापरणे, ठरल्या पेक्षा कमी उंची ठेवणे, तलावांचे गट नं. बदलणे इत्यादी स्वरुपाचा गैरकारभार केल्याने या बंधाऱ्यात पाणी न थांबता बाहेर वाहून जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याच स्वरुपाच्या तक्रारी इतर बंधाऱ्याबाबत आल्या असून काही बंधारे तर जायकवाडीच्या बॅक वॉटरपलीकडे बांधण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर बंधाऱ्यांचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे** : (१) अंशत: खरे आहे. यासंदर्भात धनगाव ता.पैठण येथील कामांबाबत तक्रार प्राप्त झाली होती.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) प्रस्तुत तक्रारीच्या अनुषंगाने अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी धनगांव गावामध्ये पूर्ण करण्यात आलेल्या ३ कामांची उपविभागीय अभियंता लघुसिंचन (जलसंधारण) उपविभाग नाथ सागर (उत्तर),

पैठण यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून चौकशीमध्ये प्राप्त तक्रारीमध्ये तथ्य आढळून आलेले नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये झालेली अनधिकृत बांधकामे

**(३३) * १०९२७७ श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये जमिनी अकृषिक न करता मोठ्या प्रमाणात बेकायदेशीररीत्या बांधकामे झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, तद्‌नुसार अनधिकृत बांधकामे करणाऱ्या विकासकांवर व त्यास सहकार्य करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा स्वरुपाचे मा.लोक प्रतिनीधी यांचे दिनांक २५/१०/२०१७ रोजीचे निवेदन जिल्हाधिकारी, ठाणे यांना प्राप्त झाले आहे.
(२) या संदर्भात अप्पर तहसिलदार यांनी सुमारे २०१ अनाधिकृत बांधकामाबाबत दंडनिय कारवाई केली आहे. तसेच तहसिलदार, अबंरनाथ यांनी ३६ अनधिकृत बांधकामाबाबत महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, १९६६ चे कलम ४५ नुसार नोटीस निर्गमित केल्या आहेत.
(३) मा.लोकप्रतिनिधी यांचे दिनांक २५/१०/२०१७ च्या निवेदनावर जिल्हाधिकारी, ठाणे यांचा सविस्तर अहवाल मागविण्यात आला आहे. जिल्हाधिकारी, ठाणे यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यावर उचित निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मंगळवेढा व पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील ओ.बी.सी., एस.बी.सी., व्ही.जे.एन.टी. अल्पसंख्यांक समाजातील शालेय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा करण्याबाबत

**(३४) * १११०५१ श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा व पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील ओ.बी.सी., एस.बी.सी., व्ही.जे.एन.टी. अल्पसंख्यांक या समाजातील शालेय विद्यार्थ्यांची गेल्या ३ वर्षापासून त्यांच्या खात्यात शिष्यवृत्तीची रक्कम जमा झाली नसल्याचे दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामाजिक न्याय विभागाकडून सन २०१५ ते २०१८ या शैक्षणिक वर्षाच्या शिष्यवृत्तीसह फ्रि-शिपची रक्कमही अद्यापि मिळाली नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसान होऊन त्यांना पुढील प्रवेशासाठी अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अर्थिक अडचणींमुळे विद्यार्थी आत्महत्या करित असल्याचे आढळून आल्यामुळे प्रलंबित शिष्यवृत्तीसाठी विविध सामाजिक संघटना यांनी निवेदन देऊनही अद्याप याबाबत शासनाने कोणतीच कार्यवाही केली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) व (५) ओ.बी.सी., एस.बी.सी., व्ही.जे.एन.टी. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम १००% अदा करण्याबाबत शासन निर्णय क्र. इबीसी२०१७/ प्र.क्र.७३/शिक्षण, दि.०७/०३/२०१८ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहे.

-----------------

## बीड जिल्ह्यामध्ये मृद आणि जलसंधारणाच्या कामात कोट्यवधी रुपयांचा झालेला गैरव्यवहार

**(३५) * १०४८९९ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात एकूण ३०० कामांमध्ये लाखो रुपयांचा निधी विविध कामांमध्ये काढतांना अधिकाऱ्यांमध्ये हिस्सा वाटणीवरुन झालेल्या भांडणात मोठा गैरव्यवहार झाल्याचे उघड होऊन २६ कामे झाली नसतानाही उक्त निधी खर्च झाल्याचे दर्शविण्यात आल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड जिल्ह्यामध्ये मृद आणि जलसंधारणाची कामे न करताच अधिकारी व ठेकेदारांनी एकत्रितपणे चार कोटी रुपयांचा अपहार केल्याने

फौजदारी कारवाई करण्याचे आदेश कृषी आयुक्तांनी दिल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,
(४) असल्यास, त्यानुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी प्राथमिक चौकशी करण्यात आली असून २४ अधिकारी / कर्मचारी यांचेकडून अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुषंगाने वसूलपात्र रक्कमेबाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना वसूलीबाबत नोटीस बजाविण्यात आली आहे. तसेच संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना निलंबित करण्यात आले असून त्यांच्याविरुध्द F.I.R. दाखल करण्यात आला आहे व त्यांच्याविरूद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३६) * ११०७७६ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) ग्रामीण रुग्णालयात डॉक्टर, कर्मचारी व तंत्रज्ञांची तसेच विशिष्ट तज्ञांची पदे न भरण्यात आल्याने रुग्णालयातील प्रयोगशाळा व क्ष-किरणाची अत्याधुनिक मशीन बंद अवस्थेत असल्याने रुग्णांना योग्य औषधोपचार व चिकित्सा मिळत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयातील सर्वच विविध संवर्गातील रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी, जिल्हा आरोग्य अधिकारी व मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे वारंवार निवेदने देऊन केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली व त्याची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.
वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| पदनाम | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| वैद्यकीय अधिक्षक | ०१ | ०१ | ०० |
| विशेषज्ञ | ०३ | ०२ | ०१ |
| तंत्रज्ञ | ०२ | ०० | ०२ |
| इतर कर्मचारी | १९ | १७ | ०२ |

वैद्यकीय अधिक्षकाचे पद भरलेले असून विशेषज्ञांच्या मंजुर पदांपैकी २ पदे भरलेली आहेत. तसेच तंत्रज्ञाची रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. सद्यस्थितीत प्रतिनियुक्तीव्दारे व कंत्राटी नियुक्तीव्दारे या पदांची कामे करण्यात येत आहेत. उपलब्ध असलेल्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत रूग्णांना सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) वैद्यकीय अधिकारी भरतीचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले असून तंत्रज्ञ व इतर कर्मचारी यांची पदे भरण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.

-----------------

## खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील धनगरवाड्यांमधील रस्त्यांच्या कामासाठी निधी देण्याबाबत

**(३७) * १०८४७६ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील ३३ गावांमधील ७५ धनगरवाड्यांपैकी अतिदुर्गम भागातील बहुतांश धनगरवाड्यांमध्ये पक्के रस्ते नसल्याने तेथील जनता अद्यापही मुलभूत सुविधांपासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदिवली, खाटेकरवाडी, ढेबेवाडी, चिराचा आंबा, मालदे, जानकरवाडी, जैतापूर, ढाणकवाडी, किंजळे, नातू, कांदोशी इ. व अन्य धनगरवाड्यांना पक्का डांबरी रस्ता नसल्याने पिण्याची पाण्याची टंचाई निर्माण झाल्यास याभागात टँकरही पोचणार नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दुर्गम भागात पक्के रस्ते नसल्याने कोणतीही वाहतूक सुविधा उपलब्ध नसल्याने या भागातील मुलांना प्राथमिक शाळा व नागरिकांना प्राथमिक आरोग्याच्या सेवांपासून वंचित रहावे लागत असल्याने या वाड्यांमध्ये पक्के रस्ते होण्यासाठी तात्काळ निधी उपलब्ध होणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची चौकशी करुन या धनगरवाड्यातील रस्ते व अन्य सुविधांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) रत्नागिरी जिल्हयातील खेड तालुक्यामध्ये एकूण ४१ गावांमध्ये ५९ धनगरवाड्या आहेत. त्यापैकी १४ वाडया रस्त्यांनी जोडलेल्या आहेत.

सदर ५९ वाड्यांपैकी १ वाडी प्रमुख जिल्हा मार्ग, २० वाड्या ग्रामीण मार्ग व उर्वरित ३८ वाड्या योजनाबाहय रस्त्यांवर आहेत. योजनाबाहय रस्त्यांसाठी शासनाकडे कोणताही निधी उपलब्ध नसल्याने सदर रस्त्यांवर खासदार/आमदार स्थानिक विकास निधी किंवा जिल्हा परिषद स्वनिधी मधून निधी उपलब्ध झाल्यास सदर रस्त्यांचे काम जिल्हा परिषदेमार्फत करणे शक्य होईल.

तसेच ग्रामीण मार्गावरील रस्त्यांचे काम विविध योजनांतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीनुसार टप्प्या टप्प्याने करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयात एचआयव्ही बाधीत पालकांकडून संसर्ग झालेल्या अपत्यांचा मृत्यू झाल्याबाबत

**(३८) * १०७४२५ श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात माहे जानेवारी ते ३१ ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत एचआयव्ही बाधीत पालकांकडून संसर्ग झालेल्या ३० अपत्यांचा एडस्‌ने मृत्यु झाल्याचे जिल्हा एडस् प्रतिबंध व नियंत्रण पथकाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयात २०१२१ इतके एचआयव्ही बाधीत रुग्ण असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्याचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, त्यानुसार एचआयव्ही बाधीत रुग्णांचा संसर्ग होऊ नये यासाठी या रुग्णांवर उपचार करण्याबाबत व एचआयव्ही आजाराच्या नियंत्रणासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

सदर कालावधीत संसर्ग झालेल्या ० ते १४ वर्ष या वयोगटातील ८२४ मुलांपैकी ५ बालकांचा मृत्यू झाला आहे.

(२) अशंत: खरे आहे.

जिल्हयात एचआयव्ही बाधीत एकूण रुग्णांची संख्या १०६१४ इतकी असल्याचे निदर्शनांस आले आहे.

(३) व (४) राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सर्व एचआयव्ही संसर्गीत व्यक्तींना तातडीने ए.आर.टी. औषध सुरु केले जाते. तसेच सदरहू कार्यक्रमाचा जिल्हास्तरावर दरमहा आढावा घेतला जातो. ए.आर.टी. केंद्राच्या माध्यमातून संसर्गीत व्यक्तींना विनामूल्य औषधोपचार सी.डी.४ रक्त चाचणी, तसेच समुपदेशन देण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## निघोटेवाडी (पांडवदरा) (ता.आंबेगाव, जि.पुणे) लघुपाटबंधारे तलावाला पुन:श्च प्रशासकीय मान्यता देण्याबाबत

**(३९) * ११०९६६ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निघोटेवाडी (पांडवदरा) (ता.आंबेगाव, जि.पुणे) या लघुपाटबंधारे तलावाच्या कामास जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांच्याकडून निर्णय क्र. लपा/प्र.क्र. /१८९५/१८८४ दिनांक १७ जुलै, २०१२ अन्वये रुपये ६०१.१९ लक्ष इतक्या रकमेस प्रशासकीय मंजुरी मिळाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पाटबंधारे तलावाचे काम सुरु न झाल्याने जलसंधारण महामंडळाने या योजनेची प्रशासकीय मान्यता रद्द करण्याचा निर्णय घेतला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तलावामुळे ९१२.६० स.घ.मी. इतका पाणी साठा होणार असून २२० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची चौकशी करुन उपरोक्त योजनेस प्रशासकीय मान्यता पुन:श्च देऊन निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय.

(२) होय.

(३) या तलावामुळे ९१२.६० स.घ.मी. इतका पाणीसाठा होणार असुन १९४ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे.

(४) लघु पाटबंधारे तलाव निघोटवाडी (पांडवदरा) या योजनेचे अंदाजपत्रक जलसंधारण विभागाची सन २०१७-१८ दरसूची नुसार सुधारीत करण्याची कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## टाकरखेड वायाळ (ता.देऊळगाव राजा, जि.बुलढाणा) ग्रामपंचायतीमधील चौदाव्या वित्त आयोगाच्या व इतर योजनांच्या निधीचा झालेला अपहार

**(४०) * १०६६५९ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टाकरखेड वायाळ (ता.देऊळगाव राजा, जि.बुलढाणा) ग्रामपंचायतीमध्ये चौदाव्या वित्त आयोग निधी, दलित वस्ती सुधार योजना, ग्रामपंचायत कर वसूली, शौचालय बांधकाम अनुदान तसेच इतर शासकीय योजनांच्या निधीमध्ये अपहार झाल्याची तक्रार गटविकास अधिकारी यांच्याकडे दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे एका ग्रामस्थांने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने या प्रकरणांची चौकशी केली आहे काय व चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, त्यानुसार योजनांच्या निधीचा अपहार करणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) होय.

प्रशासकीय अनियमितता आढळून आली.

(३) दोषींवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इवळेश्वर (ता.माहूर, जि.नांदेड) गावांत शौचालय व सिंचन विहीरीच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(४१) * ११२९४५ श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इवळेश्वर (ता.माहूर, जि.नांदेड) गावांत सन २०१६-१७ मध्ये झालेल्या शौचालय व सिंचन विहीरीच्या कामात ग्रामसेवक व ग्रामरोजगारांनी संगनमताने

गैरव्यवहार केल्याची व आजी-माजी सरपंचासह गैरव्यवहार केल्याची तक्रार माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काही ठिकाणी ग्रामसेवक व रोजगार सेवकांनी शौचालय बांधकाम न करता काही लाभार्थ्यांच्या नांवाने बनावट शौचालयाचे फोटो लाऊन अनुदान घेतले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) व (३) उक्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. १८.०१.२०१८ रोजी विस्तार अधिकारी (पं) शाखा अभियंता व तांत्रिक अधिकारी मनरेगा यांनी प्रत्यक्ष तक्रार धारकांसह समक्ष चौकशी केली आहे. सदर चौकशी ग्राम पंचायत मार्फत सन २०१६-१७ या वर्षात व तक्रारी मुद्द्यानुसार शौचालय बांधकाम ३१ लाभार्थ्यांनी स्व:त केले व त्यांना त्यांच्या खात्यात अनुदानाची रक्कम प्रस्ताव सादर केल्यानुसार अदा केली आहे. ग्रामसेवक व ग्राम रोजगार सेवक यांचा या प्रकरणामध्ये संबंध नाही.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील वसुंधरा एकात्मिक पाणलोट विकास प्रकल्पांतर्गत विविध कामे प्रलंबित असल्याबाबत

**(४२) * ११५५१३ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील वसुंधरा एकात्मिक पाणलोट विकास प्रकल्पांतर्गत जिल्ह्यातील विविध कामे करण्यासाठी ग्रामपंचायतींना नमुना देवूनही गेल्या २ वर्षापासून कामे सुरू न झाल्याने गावातील गाव तलाव मजबूतीकरण, विहीर दुरूस्ती, शाळा अभ्यासिका उभारणी, बायोगॅस उभारणे, जमीन तपासणी इत्यादी कामे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील वसुंधरा एकात्मिक पाणलोट विकास प्रकल्पांतर्गतची कामे तातडीने सुरू करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनीधींनी जिल्हा कृषि अधिक्षक यांच्याकडे दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीनुसार कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी तालुक्यातील वसुंधरा एकात्मिक पाणलोट विकास प्रकल्पांतर्गत कामे तात्काळ सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत गावातील गाव तलाव मजबुतीकरण, विहिर दुरुस्ती, शाळा, अभ्यासिका उभारणी, बायोगॅस उभारणी इ. कामे प्रेरक प्रवेश उपक्रम या घटकाखाली येतात. या घटकांतर्गत कोल्हापूर जिल्हयामध्ये काही निवडक कामे प्रलंबित आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) केंद्र शासनाच्या धोरणाप्रमाणे उर्वरित कामे पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चांडोली (ता.खेड, जि.पुणे) येथील ट्रॉमा केअर युनिट मध्ये वैद्यकीय यंत्रसामग्री नसल्याबाबत

**(४३) * ११६११२ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चांडोली (ता.खेड, जि.पुणे) येथील ग्रामीण रुग्णालयात ट्रॉमा केअर सेंटर मंजूर असून त्याचे संपूर्ण बांधकाम पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ट्रॉमा केअर युनिटसाठी मंजूर आकृतिबंधामधील वैद्यकीय अधिकारी तसेच इतर कर्मचाऱ्यांनी नियुक्ती करुनही यंत्रसामग्री नसल्याने गरजू रुग्णांना उचारासाठी ट्रॉमा केअर चा वापर करणे शक्य होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लाखो रुपये खर्च करून बांधलेले ट्रॉमा केअर युनिट सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) चांडोली येथील ट्रॉमा केअर युनिटचे कामकाज व्यवस्थित चालू आहे. ट्रॉमा केअरच्या इमारतीमध्ये सी.आर्म मशीन, पॉवर बोर्न ड्रिल, न्युमेटीक टुर्निकेट, सेल काउंटर, पोर्टेबल MA X-ray इ. उपकरणे व साहित्य याचा पुरवठा करण्यात आला आहे. ग्रामीण रुग्णालय व ट्रॉमा केअर युनिट येथे सप्टेंबर, २०१७ ते फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत ७६६४ बाहयरुग्ण, ९० आंतररुग्ण, २९ प्लास्टर, ४ मोठ्या व ६५ लहान शस्त्रक्रिया अशा सेवा पुरविण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विष्णुपुरी (जि.नांदेड) प्रकल्पातून कालव्यात सोडण्यासाठी पाणी वाहून नेणाऱ्या पाइपलाईनला गळती लागल्याबाबत

**(४४) * १०९१८२ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील विष्णुपुरी प्रकल्पातून कालव्यात सोडण्यासाठी पाणी वाहून नेणाऱ्या पाइपलाईनला मोठ्या प्रमाणात गळती लागली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ही गळती रोखण्यासाठी संबंधितांनी कायमस्वरुपी उपाययोजना न करता तात्पुरत्या स्वरुपाची उपाययोजना केली असल्याने ही गळती न थांबता पाईपलाईनच्या आजुबाजूला पाणी साचत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार पाइपलाईनची गळती थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) जानेवारी २०१८ च्या दरम्यान पाणी वाहून नेणाऱ्या पाईपलाईनला काही ठिकाणी छिद्रे पडल्याचे व ल्याप प्लेट व मॅनहोल मधून काही प्रमाणात तसेच उध्दरण नलिकेच्या प्रसरण सांध्यांमधून काही प्रमाणात पाणीगळती होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) सदरील पाईपलाईन ही २८ वर्ष जुनी झालेली आहे. प्रामुख्याने प्रसरण सांध्यामधून गळती असल्याचे निदर्शनास आले. पाईपलाईनमध्ये पाणी चालू असल्यामुळे कायमस्वरुपी उपाययोजना करता येणे शक्य नसल्याने तात्पुरत्या उपाययोजनेव्दारे गळती कमी करण्याचा प्रयत्न केला आहे, तरीही काही प्रमाणात पाईपलाईनच्या आजुबाजुला पाणी साचते हे खरे आहे.

(३) यांत्रिकी विभागातर्फे अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांनी पाणी गळती संदर्भात उध्दरण नलिकेची संयुक्त पाहणी करुन त्यापैकी पाईप लाईनला पडलेली छिद्रे, ल्याप प्लेट व मॅनहोल यामधून होणारी पाणी गळती दुरुस्ती कामे करुन तातडीने बंद करण्यात आली आहे. गळती होत असणाऱ्या प्रसरण सांध्याची पूर्ण दुरुस्ती पाणी पाळी दरम्यान करणे शक्य नसल्यामुळे सदरील दुरुस्ती ही या वर्षीच्या पाणी पाळी संपल्यानंतर करण्याचे नियोजित आहे.

तसेच पाणी गळतीबाबत कायमस्वरूपी उपाययोजना सूचविण्याकरीता यांत्रिकी विभागातर्फे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांना दि.०१/०२/२०१८ च्या पत्राव्दारे विनंती केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खेड-नांदिवली-मालदे, खेड-बिरमणी-वडगाव व चिंचवली-बोरघर-शिंगरवाडी (ता.खेड, जि.रत्नागिरी) या ग्रामीण भागातील रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(४५) * ११५४०१ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील खेड-नांदिवली-मालदे रस्ता, खेड-बिरमणी-वडगाव व चिंचवली-बोरघर-शिंगरवाडी या ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरवस्था झाली असून या रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम निधी अभावी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्यांवर वारंवार अपघात होत असून ग्रामस्थ, विद्यार्थी तसेच कोकणात पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांची गैरसोय होत असल्याने उक्त रस्त्यांच्या कामासाठी तातडीने निधी देवून उक्त रस्त्यांचे डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने उक्त रस्त्यांची पाहणी केली आहे काय व त्यानुसार रस्त्यांचे डांबरीकरण करण्यासाठी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) प्रश्नांकित रस्त्यांच्या कामासाठी तातडीने निधी देवून रस्त्यांचे डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे. तथापि, सदर रस्त्यांवर वारंवार अपघात होत असल्याचे आढळून आले नाही.
(३) प्रश्नांकित रस्त्याची जिल्हा परिषदेमार्फत पाहणी करण्यात आली आहे.
खेड-नांदिवली-मालदे - रस्ते विकास योजना सन २००१-२०२१ नुसार या रस्त्याचे नांव वाडी मालदे रस्ता असून हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.४४ दर्जाचा आहे. रस्त्याची एकूण लांबी ३.०० कि.मी. आहे.
खेड-बिरमणी-वडगाव - रस्ते विकास योजना सन २००१-२०२१ नुसार या रस्त्याचे नांव किंजळे कळबणी वडगाव बु वडगाव खुर्द रस्ता असे असून हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.८ दर्जाचा आहे. रस्त्याची एकूण लांबी ६.५०० कि.मी. आहे.
चिंचवली-बोरघर-शिंगरवाडी - रस्ते विकास योजना सन २००१-२०२१ नुसार या रस्त्याचे नाव बोरघर चिंचवली शिंगरवाडी रस्ता असे असून हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.४० दर्जाचा आहे. रस्त्याची अस्तित्वातील एकूण लांबी ६.५०० कि.मी. आहे.

सदर रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम विविध योजनांतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीनुसार टप्प्या टप्प्याने करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## घाटबोरी (ता.मेहकर, जि.बुलढाणा) परिसरातील गावातील शेतकऱ्यांचे वन्य प्राण्यांमुळे झालेल्या नुकसानीबाबत

**(४६) * ११२७४९ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यातील घाटबोरी परिसरात २५ गावे येत असून या गावातील शेतकऱ्यांचे वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामुळे झालेल्या नुकसानीबाबतचे प्रस्ताव गेल्या वर्षभरापासून प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार नुकसानग्रस्तांना तातडीने नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) आर्थिक वर्ष सन २०१७-१८ माहे फेब्रुवारी, २०१८ अखेर या कालावधीत वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), घाटबोरी यांचेकडे वन्यप्राण्यांनी शेतपिकांचे नुकसान केल्याने नुकसान भरपाई मिळण्याबाबतचे एकुण ८४० अर्ज प्राप्त झाले आहेत.

उपरोक्त प्रकरणांपैकी ७६२ प्रकरणामध्ये संपुर्ण कागदपत्रे प्राप्त झाली असून प्रचलित शासन निर्णयातील तरतुदींनुसार संबंधित शेतकऱ्यांना रु.३९,६१,३३४ अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे. उर्वरित ७८ प्रकरणांमध्ये आवश्यक कागदपत्रांची त्वरीत पूर्तता करून नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आजरा व चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पिकांचे रानटी हत्तींपासून झालेले नुकसान

**(४७) * १०७२५० श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड व आजरा (जि.कोल्हापूर) तालुक्यात हत्तींचा वावर सुरू असून या हत्तींच्या कळपाने खेडे, हाजगोळी, सोहाळे भागातील ऊस, काजू, नारळ, भात, केळी आदी पिकांचे नुकसान केले असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आजरा तालुक्याच्या पश्चिम भागात किटवडे, आंबाडे या गावांमध्ये बिबट्या सदृश प्राण्याने शेळी, वासरे यासारख्या पाळीव जनावरांवर हल्ले केले आहेत तसेच रानटी हत्तीपासून गेल्या वर्षभरात ५ शेतकऱ्यांना प्राण गमवावा लागला असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.वने मंत्री यांच्याकडे दिनांक ९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास याबाबत निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासह एलिफंट बॅक सारखी मोहीम स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) चंदगड व आजरा तालुक्यातील खेडे, हाजगोळी, सोहाळे भागात माहे जानेवारी, २०१८ वा त्यादरम्यान हत्तींनी शेतपिकांचे नुकसान केल्याच्या घटना निदर्शनास आलेली नाही. तथापी सन २०१७-१८ मध्ये हत्तींपासून पिक नुकसानीचे आजरा तालुक्यात १३५ प्रकरणे व चंदगड तालुक्यात १९ प्रकरणे निदर्शनास आली असून प्रचलित शासननिर्णयातील तरतुदीनुसार संबंधित शेतकऱ्यांना रु. ९,११,११० इतके अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

(२) व (३) आजरा तालुक्यातील मौजे किटवडे या गावामध्ये दिनांक ०६.०१.२०१८ रोजी बिबट या वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात श्री. विश्राम तु. सुतार यांची एक शेळी व एक बकरा हे पाळीव प्राणी ठार झाले आहेत. सदर प्रकरणी प्रचलित शासननिर्णयातील तरतुदीनुसार शेतकऱ्यास रु.१२,०००/- इतके अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

हत्तींनी हल्ला केल्यामुळे गेल्या वर्षभरात ५ शेतकऱ्यांना प्राण गमवावा लागला हे खरे नाही. तथापि अशा आशयाचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मंत्री (वने) यांना दिनांक ०९ जानेवारी, २०१८ रोजी दिले हे खरे आहे.

वन्य प्राण्यांद्वारे नुकसान होऊ नये व मानव वन्यहत्ती संघर्ष कमी व्हावा यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

• या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींकडून सर्वांना प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात येते.

• गावकऱ्यांच्या मदतीने टॉर्च, फटाके, अग्नीबाण इ. चा वापर करुन व हाकारा गट तयार करुन हत्तींना शेती व मानवी वस्तीपासून दूर नेण्यात येते.

• वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी उपाययोजना केल्या जातात.

• काही क्षेत्रात वनहद्दींवर वन्यप्राणी प्रतिबंधक चर खोदण्यात आले आहेत, तसेच Rescue Team तयार करण्यात आली आहे.

• मानव वन्यप्राणी संघर्ष रोखण्याच्या दृष्टीने वनअधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात येते.

• वनांवरील अवलंबन कमी करण्याच्या दृष्टीने सबसिडीवर एलपीजी गॅस शेगडी व सिलेंडर पुरवठा केला जात आहे.

• परिक्षेत्र स्तरावर क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत नियमित गस्त करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे सावरगांव (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथे १४ व्या वित्त आयोगांतर्गत करण्यात आलेल्या कामात झालेला गैरव्यवहार

**(४८) * १११४८२ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सावरगांव (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथे १४ व्या वित्त आयोगांतर्गत करण्यात आलेल्या रस्ता बांधकामात गैरव्यवहार झाल्याबाबतची तक्रार दिनांक ७ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास स्थानिक नागरिकांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार १४ व्या वित्त आयोगाअंतर्गत करण्यात आलेल्या कामात गैरव्यवहार करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) होय.

रस्त्याच्या कामाची स्थिती प्रथम दर्शनी चांगली दिसून आली. सदर बांधकामात कोणताही गैरव्यवहार झालेला आढळून आलेला नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हयातील १२४१ पाझर तलावांची निर्मिती करण्यासाठी संपादित केलेल्या जमिनींच्या नोंदी करण्याबाबत

**(४९) * १११९०७ श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात जिल्हा परिषदेने तालुका निहाय गेल्या ५४ वर्षात रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून १२४१ पाझर तलावांची निर्मिती करण्यासाठी शेतकऱ्यांकडून १० एकरापासून ४५ एकर जमीनीचे भूसंपादन करुन भूसंपादन केलेल्या जमीनींचा मोबदला शेतकऱ्यांना दिला असताना १२४१ पाझर तलावातील बऱ्याच तलावांच्या जमिनी कायदेशीरपणे जिल्हा परिषदेच्या ताब्यात नसल्याने अनेक जमिनींच्या ७/१२ उताऱ्यावर जिल्हा परिषदेचे नांवच नसल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत जिल्हा परिषद सोलापूर प्रशासनाकडे माहिती घेतली असता त्यांच्याकडे उपरोक्त प्रकरणाची ७/१२ ची नोंदीची पुरेशी माहिती नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार संबंधित जिल्हा परिषदेच्या विभागाला जमिनींच्या नोंदी करण्याकरीता तात्काळ निर्देश देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२), (३), (४) व (५) जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या अधिपत्याखालील लघुपाटबंधारे विभागामार्फत १२४१ पाझर तलाव पूर्ण करण्यात आले आहेत. त्यापैकी ८४५ तलावाच्या ७/१२ उताऱ्यावर जिल्हा परिषदेचे नाव लावण्याची कार्यवाही सुरू आहे व ३९६ पाझर तलावांच्या नोंदी ७/१२ उताऱ्यावर घेण्यात आलेल्या आहेत.

सदर १२४१ तलावांपैकी १४५ पाझर तलावाच्या जमीनीचा मोबदला देणे बाकी असून, उर्वरित १०९६ पाझर तलावांचा मोबदला अदा करण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत प्रश्नांकित पाझर तलावांसाठी संपादित जमीनीच्या ७/१२ उताऱ्यावर जिल्हा परिषदेचे नाव लावण्यासाठी जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे मार्फत संबंधित सर्व तहसिलदारांना सूचना देण्यात आल्या आहेत व त्यानुसार ७/१२ उताऱ्यावर नावे लावण्याची कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## गंगापूर (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील घोड नदीच्या पुलावरील लोखंडी संरक्षक कठड्यांची झालेली दुरवस्था

**(५०) * ११३७०० श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगापूर (ता.आंबेगाव, जि.पुणे) या आदिवासी भागातील घोड नदीच्या पुलावरील लोखंडी संरक्षक कठड्यांची दुरवस्था झाल्याने वाहतूकीकरिता पूल अत्यंत धोकादायक झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घोड नदीच्या पूलावरील संरक्षक कठडे बसविण्याची मागणी ग्रामस्थांनी वारंवार करुन देखील त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सदर पुलाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे अशंत: खरे आहे.

सदर को.प.बंधारा वजा पुलास दोन्ही बाजुस संरक्षक रेलींग असून काही ठिकाणी रेलींग व कठडे अंशत: तुटलेले आहेत.

(२), (३), (४) व (५) सदर बंधाऱ्याची क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी पाहणी केलेली आहे. को.प.बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार केलेले असून निधी उपलब्धतेनुसार काम करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## सुजलगांव (जि.बुलढाणा) पाझर तलावासाठी संपादित केलेल्या जमिनींचा मोबदला शेतकऱ्यांना मिळण्याबाबत

**(५१) * १०६९६६ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुजलगांव (जि.बुलढाणा) येथील पाझर तलावामध्ये सन २०११-१२ मध्ये शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या असताना त्याचा ५० टक्केच मोबदला शेतकऱ्यांना मिळाला असून उर्वरित मोबदला तातडीने देण्याची मागणी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी उपजिल्हाधिकारी भू-संपादन (ल.सी.का.) बुलढाणा यांच्याकडे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने शासनाने याबाबतची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार या प्रकल्पग्रस्तांना तातडीने मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय.

(२) व (३) होय. महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांचेकडून निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला असुन, सुलजगांव पाझर तलावासाठी जमिनी संपादित करण्यात आलेल्या शेतकऱ्यांना मोबदला वाटपासाठी प्रादेशिक जलसंधारण अधिकारी कार्यालयाने धनादेश क्रमांक ०२७०५१ दिनांक २१/२/२०१८ नुसार निधी उपजिल्हाधिकारी भूसंपादन (ल.सिं.का.) बुलढाणा यांच्याकडे दिनांक २१/२/२०१८ रोजी पाठविण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जालगाव-कोळबांद्रे, देगाव-पांगारी, आसुद- वाघिवणे, आडे-इळणे-वाघिवणे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) या ग्रामीण भागातील रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(५२) * ११५४०४ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील जालगाव-कोळबांद्रे, देगाव-पांगारी, आसुद-वाघिवणे, आडे-इळणे-वाघिवणे या ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरवस्था झाली असून या रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम निधी अभावी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्यांवर वारंवार अपघात होत असून ग्रामस्थ, विद्यार्थी तसेच कोकणात पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांची गैरसोय होत असल्याने उक्त रस्त्यांचे कामासाठी तात्काळ निधी देवून उक्त रस्त्यांचे डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी विभागाकडे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने शासनाने उक्त रस्त्यांची पाहणी केली आहे काय व त्यानुसार या रस्त्यांचे डांबरीकरण व मजबूतीकरण करण्यासाठी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) लोकप्रतिनिधी यांची मागणी आहे हे खरे आहे, परंतु सदर रस्त्यावर अपघात झाल्याचे आढळून आले नाही.
(३) जिल्हा परिषदेमार्फत प्रश्नांकित ४ रस्त्यांची पाहणी करण्यात आली आहे.

अ) जालगाव कोळबांद्रे या इतर जिल्हा मार्ग क्र.१९ दर्जाच्या रस्त्याची अस्तित्वातील लांबी १६.२८० कि.मी. आहे. संपूर्ण पृष्ठभाग डांबरी आहे. त्यापैकी ३.६०० कि.मी. लांबी सुस्थितीत आहे. सन २०१५-१६ मध्ये रस्ते विशेष दुरुस्ती अंतर्गत सा.क्र. ११/१०० ते ११/२०० कि.मी. लांबीतील डांबरीनुतनीकरणाचे काम करण्यात आले आहे.

ब) देगाव पांगारी या ग्रामीण मार्ग क्र. १३८ रस्त्याची एकूण लांबी ५.५०० कि.मी. आहे. त्यापैकी २.३०० कि.मी. लांबी डांबरी पृष्ठभागाची व ३.२०० कि.मी. लांबी खडी पृष्ठभागाची आहे. डांबरी पृष्ठभागापैकी १.८०० कि.मी. लांबी सुस्थितीत आहे.

क) आसूद वाघिवणे या ग्रामीण मार्ग क्र. ५२ ची एकूण लांबी ७.०० कि.मी. आहे. त्यापैकी २.०० कि.मी. लांबी डांबरी पृष्ठभागाची व ५.०० कि.मी. लांबीमध्ये पृष्ठभाग अस्तित्वात नाही.

ड) आडे-इळणे-वाघिवणे या ग्रामीण मार्ग क्र. १९१ ची एकूण लांबी ६.६०० कि.मी. आहे. त्यापैकी ३.५०० कि.मी. लांबी डांबरी पृष्ठभागाची, १.०० कि.मी. लांबी खडी पृष्ठभागाची व २.१०० कि.मी. लांबीमध्ये पृष्ठभाग अस्तित्वात नाही. डांबरी पृष्ठभागापैकी २.५०० कि.मी. लांबी सुस्थितीत आहे.

वरील चारही रस्त्यांच्या खराब लांबीतील दुरुस्ती जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रोहिणखेड-काळेगांव (ता.मोताळा, जि.बुलढाणा) या रस्त्यावरील पुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(५३) * ११३४५० श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहिणखेड-काळेगांव (ता.मोताळा, जि.बुलढाणा) या रस्त्यावरील पुलाचे काम न झाल्याने स्थानिक नागरिक, शालेय विद्यार्थी व रूग्णांची पावसाळ्यात गैरसोय होऊन वाहतूकीस अडथळा होत असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार उक्त रस्त्यावरील पुलाचे काम मंजूर करण्यासह निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

रोहिणखेड-काळेगांव या रस्त्यावरील पुलाचे काम न झाल्याने स्थानिकांची गैरसोय होत आहे. तथापि, अशा प्रकारचे कोणतेही पत्र/निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) व (३) रोहिणखेड-काळेगांव हा अस्तित्वातील ५.०० कि.मी. लांबीचा योजनाबाहय रस्ता आहे. अस्तित्वातील रस्ता हा पांदण व बैलगाडीचा आहे. योजनाबाहय रस्ता असल्यामुळे योजनेमधून निधी उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे सदर रस्ता निकषानुसार योजनेत समाविष्ट करण्याबाबत जिल्हा परिषदेकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील ओझेवाडी ते संत दामाजी सहकारी साखर कारखान्यापासून मंगळवेढा-सोलापूर रस्त्याची झालेली दुरवस्था

**(५४) * १११२०४ श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर व मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील ओझेवाडी ते संत दामाजी सहकारी साखर कारखाना पासून मंगळवेढा-सोलापूर रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतुक होत असल्यामुळे या रस्त्याला खड्डे पडले असल्याने अपघात होऊन त्यामध्ये नागरिक मृत्युमुखी पडल्याच्या घटना दिवसें-दिवस वाढत असल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्ता तातडीने दुरूस्ती करण्यासाठी लोकप्रतिनिधी व नागरिकांनी मागणी केली असतांनाही अद्याप सदर रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत कोणतीच कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर रस्ता तात्काळ दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्नांकित ओझेवाडी ते संत दामाजी सहकारी साखर कारखाना रस्त्याच्या लांबीपैकी ५.३० कि.मी. क्षतिग्रस्त लांबीतील रस्त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरण करण्याचे काम प्रगतीत आहे.

(३) व (४) प्रश्नांकित रस्त्यांपैकी ओझेवाडी- श्री संत दामाजी साखर कारखाना हा रस्ता गोपाळपूर-ओझेवाडी-उचेठाण- बढाण रस्ता प्रजिमा ७० चा भाग आहे. या भागाची लांबी ५.३० कि.मी. आहे. या लांबीतील रस्ता डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरुन वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आला आहे. रस्त्याच्या क्षतिग्रस्त लांबीत मजबूतीकरण डांबरीकरणाचे काम प्रगतीत आहे. रस्ता सा.बां. विभागाच्या अखत्यारीत आहे. प्रजिमा ७० ते ब्रम्हपूरी रस्ता ग्रा.मा.१०२ असून

५.५० कि.मी. लांबीचा आहे. यापैकी १ कि.मी. लांबी डांबरी पृष्ठभाग, २ कि.मी. लांबी खडीच्या पृष्ठभागाची आहे. रस्ता जि.प. सोलापूर यांच्या अखत्यारीत आहे. या दोन्ही रस्त्यांवर रस्त्यांच्या दोषामुळे अपघात झाल्याची नोंद पोलीस दप्तरी नाही. दोन्ही रस्त्यांच्या क्षतिग्रस्त लांबीतील कामे करणे आवश्यक आहे. ही कामे मंजूरी निधी निकष व प्राधान्य क्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.